## संक्षिप्त वृत्त

### घरातील एक लाखाची रोख रक्कम लंपास

**सोलापूर :** घराच्या गच्चीवरील उघड्या असलेल्या दारातून अज्ञात चोरट्याने आनंद मुदगल यांच्या घरात प्रवेश करत बेडरूममधील लोखंडी कपाटातील १,००,००० रोख रक्कम चोरून नेल्याची घटना आहे. दि २४/०८/२०२५ रोजी ७.३० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास न्यू पाच्छा पेठ, पाथरूट चौक, सोलापूर येथे घडली आहे. याप्रकरणी आनंद केशव मुदगल (वय-४३, रा. ४८९, न्यू पाच्छा पेठ, पाथरूट चौक, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात भा. न्या. संहिता कलम ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी सरतापे हे करत आहेत.

---

### जुना पुणे नाका येथून दुचाकी चोरीला

**सोलापूर :** सोलापूर शहरातील जुना पुणे नाका येथून (दि.२०) ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास एमएच २१ बी एक्स ७८३९ ही १,२१,००० रूपये किंमतीची राखाडी रंगाची होन्डा युनीकॉर्न मोटरसायकल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी लवकेश अभय देसरडा, (रा. जीवनराज भवन, ५६/१०, जुना पुना नाका, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात भा. न्या. संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे फौजदार चावडी पोलीस ठाण्यात (दि.२५) ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस कर्मचारी परीट हे करत आहेत.

---

### मुस्लिम पाच्छा पेठेतून मोटारसायकल चोरीला




**सोलापूर :** सोलापूर शहरातील भगतसिंग चौक मुस्लिम पाच्छा पेठ येथून दि. ०९/०३/२०२५ रोजी ते दि. १४/०३/२०२५ रोजी कालावधीत ६.३० वाजण्याच्या सुमारास एमपी १११२५ ही २५,००० किंमतीची सिल्वर रंगाची यामाहा आरएक्स १०० मोटरसायकल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी ऋत्वीक महांतेश सोनेगार (वय २२, रा. ३७७/१६, भगतसिंग चौक, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात भा. न्या. संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे जेलरोड पोलीस ठाण्यात (दि.२५) ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस कर्मचारी परीट हे करत आहेत.

---

### चारित्र्यावर संशय घेत विवाहितेचा छळ; पतीसह दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** चारित्र्यावर संशय घेत, पैसे मागण्याच्या कारणावरून विवाहितेला अपमानीत केले. तसेच वारंवार शिवीगाळ करत मारहाण केली. सातत्याने मानसिक, शारीरिक व आर्थिक छळ केला आहे. ही घटना दि. १५/०३/२०१६ रोजी ते दि ०५/०८/२०२५ रोजी फिर्यादीचे सासरी विडी घरकुल सोलापूर येथे घडली आहे. या प्रकरणी शिवानी विशाल वाकोडे (वय-३०, रा. ४०/अ ग्रुप, विडी घरकुल, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून पती विशाल, सासू रचना, दीर कुणाल, (रा.२०१, अकुर बिल्डींग ए, लिबर्टी गार्डन, मालाड, मुंबई) याच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात भा. न्या. सहिता कलम ८५,११५(२), ३५२,३५१(२), ३ (५) प्रमाणे (दि.२५) ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी नवले करत आहेत.

---

### मैत्रिणीला का बोलतो म्हणून युवकाला मारहाण; गुन्हा दाखल

**सोलापूर :** तू माझ्या मैत्रीणसोबत का बोलतो, असे म्हणत शिवीगाळ करत असताना फिर्यादी ओंकार काळे याने त्यास विरोध केला असता आरोपी अक्षय परदेशी याने अचानकपणे कोयता घेवून अंगावर मारण्यास धावून आला असता ओंकारने तो चुकविण्यासाठी हात पुढे केला असता त्याच्या डाव्या हातावर गंभीर जखम झाली. तसेच ईतर मित्रांनी आडविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना देखील संशयित आरोपीने लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तेथून पळून गेला आहे. ही घटना (दि २३) ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास रेल्वे स्टेशन जवळ सोलापूर येथे घडली आहे. याप्रकरणी ओंकार दिनेश काळे, (रा. ४७ न्यू तिन्हेगाव फॉरेस्ट, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अक्षय राहुल परदेशी आणि त्याचे इतर तीन मित्र यांच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात भा.न्या. संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२.३५१ (२), ३(५) प्रमाणे (दी.२५) ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी गडेराव करत आहेत.

---

### पुणे शहरातील १८०९ समाजकंटकांवर पोलिसांची कारवाई

**पिंपरी :** गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्थित राहावी आणि समाजविघातक घटकांवर पोलिसांचा धाक निर्माण व्हावा, यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी व्यापक तयारी केली आहे. शहरातील तब्बल १,८०९ समाजकंटकांवर विविध कायद्यांखाली प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्याचबरोबर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी स्वतंत्र नियोजन, गस्त व नाकाबंदीची कडक अंमलबजावणी आणि मोठा पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. गणेशोत्सव काळात महत्त्वाच्या चौकांमध्ये वाहतूक पोलिसांची स्वतंत्र नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी दोन अधिकारी व १०० होमगार्डचे अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. गणेश विसर्जनाच्या सातव्या व अकराव्या दिवशी ३८ मिरवणूक मार्गांवरील वाहतूक वळविण्यात आली आहे. शांतता व सुरक्षेसाठी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात ठेवण्यात आला आहे. यात १ पोलिस सहआयुक्त, १ अपर पोलिस आयुक्त, ६ पोलिस उपायुक्त, ९ सहाय्यक पोलिस आयुक्त, ६४ पोलिस निरीक्षक, २९१ उपनिरीक्षक/सहायक निरीक्षक, २,३५५ पोलिस अंमलदार, ४०० होमगार्ड, २ एसआरपीएफ प्लाटून, १ बीडीडीएस पथक, १७ स्ट्रायकिंग फोर्स आणि ६ आरसीपी प्लाटून यांचा समावेश आहे.

---

### डीजेचा आवाज नाही... दणदणाटाची तमा नाही... चुकल्यागत वाटलं नाही...

# पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघाल्या श्रींच्या मिरवणुका

### आनंद अन् उत्साहाला उधाण, मंडळं अन् घरोघरी बाप्पांची प्राणप्रतिष्ठापना

**सोलापूर/प्रतिनिधी**

**सुखकर्ता दुःखहर्ता विघ्नविनाशक लाडक्या गणरायाचे बुधवारी शहर व परिसरात मोठ्या उत्साहात आणि आनंदात आगमन झाले. राज्य सरकारने पहिल्यांदाच गणेशोत्सव हा राज्यउत्सव म्हणून जाहीर केल्यानंतर सर्वत्र बाप्पांच्या स्वागताची धूम पहावयास मिळाली. शहरात सुमारे दीड लाख घरगुती गणपतींची तर ११५० सार्वजनिक मंडळांच्या गणपतींची प्राणप्रतिष्ठापना १८०० पोलिसांच्या बंदोबस्तात मोठ्या उत्साही वातावरणात झाली. यावेळी शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठा गजबजलेल्या होत्या. बच्चेकंपनीसह आबालवृद्धांनी श्रींच्या मूर्तीसह प्रासादिक आणि गृहसजावटीच्या साहित्यांची खरेदीसाठी एकच गर्दी केल्याचे चित्र यावेळी दिसून आले.**

दरम्यान, यंदाच्या वर्षी मुख्यत्वे, सोलापुरात बहुतांश सार्वजनिक मंडळांनी डीजेला फाटा देत पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुका काढून लाडक्या बाप्पांची प्राणप्रतिष्ठापना केली. डीजेचा कर्णकर्कश आवाजाचा त्रास न झाल्याने शहरवासियांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. डीजे आवाज नाही... दणदणाटाची तमा नाही...चुकल्यागत वाटलं नाही...अशा प्रतिक्रिया शहरवासियांमधून व्यक्त झाल्या.

गणेशोत्सवानिमित्त पोलीस आयुक्तालयाच्या वतीने शहरात सुमारे १८०० पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहर पोलिसांनी ऑनलाइन प्रक्रियेद्वारे सुमारे ८० टक्के सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवाने दिले आहेत. तर आणखी काही मंडळांकडून परवाना घेण्याचे काम सुरूच आहे.



सोलापूर : इंडियन मॉडेल स्कूलने काढलेल्या भव्य-दिव्य मिरवणुकीत सहभागी झालेल्या विद्यार्थिनींच्या ढोल पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



सोलापूर : पारंपारिक मैदानी लेझीम खेळाच्या सादरीकरणात निघालेली कसबा गणेशोत्सव तरूण मंडळाची ही देखणी मिरवणूक.

#### पोलिसांचा राहिला तगडा बंदोबस्त, अनुचित घटना टाळण्यासाठी करडी नजर

श्रीगणेश प्रतिष्ठापनेसाठी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ३ पोलीस उपायुक्त, ५ सहाय्यक पोलीस आयुक्त, २३ पोलीस निरीक्षक आणि ६४ उपनिरीक्षक सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचा बंदोबस्त यासाठी लावण्यात आला होता. तर गणेशोत्सव काळात परजिल्ह्यातील एक डीवायएसपी, १० फौजदार, २५ पोलीस अंमलदार, ५०० होमगार्ड व १०० जवानांची राज्य राखीव दलाची एक तुकडीसह एकूण १८०० पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. उत्सव काळात शहरातील संवेदनशील ठिकाणी कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी फिक्स पॉइंट लावण्यात आलेले आहेत.

#### पारंपरिक वाद्यांवर गणेश भक्तांनी धरला ठेका, लेझीमच्या मर्दानी खेळाचं झालं भव्य सादरीकरण

सोलापूर शहर परिसरात डॉल्बी व डीजे यांचा वापर टाळून विविध गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी लेझिम पथकांच्या पारंपरिक वाद्यवृंदच्या तालावर लक्षवेधी मिरवणूक काढली. यावेळी संबळचा ठेका धरून 'वाह रे वाह रे' च्या घोषणेने अंगावर शहारे आणले. सर्वत्र पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या श्री भक्तांमध्ये एक वेगळाच जोष यावेळी बाप्पाच्या स्वागताला दिसून आला. पारंपरिक वाद्यांवर गणेश भक्तांनी ठेका धरला. लेझीमच्या मर्दानी खेळाचे भव्य सादरीकरण यावेळी दिसून आले.

# आरक्षणाच्या वेडात मराठे वीर दौडणार सात नव्हे, एक साथ! लाखो सोलापुरी मराठ्यांची आज दौडणार मुंबईच्या दिशेने फौज

**सोलापूर/प्रतिनिधी**

- बुधवारीदेखील शेकडो कार्यकर्ते 'सिद्धेश्वर' ने झाले मार्गस्थ
- रेल्वे स्थानकावर गुंजला नारा

'घरात बसला, तो मराठा कसला?'
''कोण म्हणतंय देत नाय....घेतल्याशिवाय येत नाय.. आता कुठे जायचं ...मुंबईला जायचं!''

मराठा आरक्षणाच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर, २९ ऑगस्ट रोजी मुंबइत होणाऱ्या आंदोलनासाठी सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील लाखो मराठा समाज बांधवांची तयारी पूर्ण झाली असून आज गुरुवारी सकाळी दहा वाजता सोलापूर जिल्ह्यातील फौज मुंबईच्या दिशेने रवाना होणार आहे.तर विनोद भोसले ,गणेश डोंगरे यांच्यासह शेकडो मराठा बांधव बुधवारी रात्री सिद्धेश्वर एक्स्प्रेसने मुंबईला रवाना झाले आहेत.

सिद्धेश्वर एक्स्प्रेसने रवाना झालेले मराठा मावळे विविध घोषणा देत रेल्वे स्टेशन वरती दाखल झाले होते. 'घरात बसला .... तो मराठा कसला? कोण म्हणतय देत नाय.. आरक्षण घेतल्याशिवाय माघारी येत नाय , आता कुठे जायचं मुंबईला जायचं' अशा विविध घोषणा देत उपस्थित मावळ्यांनी रेल्वे स्टेशन परिसर दणाणून सोडला होता. मोर्चात निघणाऱ्या वाहनाकरिता स्टिकर आणि भगव्या टोप्या आणि टॉवेल यांचे वाटप सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले.

मराठा समाजाला ओबीसी मधूनच आरक्षण देण्यात यावे आणि सग्या सोयऱ्यांचा जीआर काढण्यात यावा अशा मागण्याकरिता मराठा समाजाच्या वतीने मुंबईच्या दिशेने आगेकूच करण्यात येत आहे.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यामधून लाखो मराठा बांधवांसह किमान २५००० वाहने मुंबईच्या दिशेने रवाना होती या वाहनांमध्ये मोटरसायकल, जीप, टेम्पो, ट्रक, ट्रॅक्टर, ॲम्बुलन्स, पाण्याचे टँकर अशा हजारो वाहनांचा समावेश असणार आहे.




सोलापूर : शुक्रवारी मुंबईत होणाऱ्या मराठा आरक्षण आंदोलनासाठी रेल्वेने निघालेल्या मराठा बांधवांनी येथील रेल्वे स्थानकावर आंदोलनाचा असा बोर्ड दाखवत घोषणाबाजी केली.

#### महापुरुषांना अभिवादन करून निघारे मराठा योद्धे

आज गुरुवार २८ ऑगस्टच्या मुंबई आंदोलनासाठी सर्व समाज बांधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मुंबईच्या दिशेने निघणार आहेत. शहरातील चार हुतात्मा पुतळे, राजमाता अहिल्यादेवी होळकर, छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज, या महापुरुषांना अभिवादन करून सर्व समाज बांधव दुचाकी व चारचाकीने मुंबईच्या दिशेने निघणार आहेत.

### मोराच्या शिकारप्रकरणी एकजण पोलिसांच्या ताब्यात

**मलकापूर :** मोरासह लांडोरीची शिकार केल्याप्रकरणी एकास ताब्यात घेण्यात आले आहे. तुळसण-ओंड रस्त्यालगत वनविभागाने ही धडक कारवाई केली. या कारवाईत मृत मोर, लांडोर, छर्रा बंदूक दुचाकी जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती वनक्षेत्रपाल ललिता पाटील यांनी दिली. वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार कोळे, कासारशिरंबे व म्हासोली वनरक्षक रविवारी रात्रगस्त घालत होते. गस्तीवर असताना तुळसण ओंड रस्त्यालगतच्या शेतामध्ये अंधारात छर्रा बंदुकीचा आवाज आला. घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, मोर व लांडोर याची शिकार झाल्याचे दिसून आले. त्याठिकाणाहून पळून जात असताना पाठलाग केला. मात्र अंधाराचा फायदा घेऊन आरोपींनी साहित्य व मुद्देमाल जागेवर टाकून तेथून पोबारा केला.

# जन्मदात्या दिवट्याने बायकोच्या मदतीने आईला फासावर लटकावलं; भयंकर घटनेने धाराशिव हादरलं, आत्महत्या केल्याचा रचला बनाव

- नवरा-बायकोला चार दिवसांची पोलिस कोठडी
- उमाबाई रणशुर यांच्या 'अशा' निधनानं सर्वत्र हळहळ

**धाराशिव/प्रतिनिधी**

किरकोळ वादाचे रूपांतर हाणामारीत होते किंवा भांडणांमध्ये होते. परंतु लोहारा येथे एक अघटीतच घटना घडली आहे. किरकोळ कारणावरून मुलगा आणि सुनेने मिळून आईला मारहाण करून फासावर लटकावल्याची भयंकर घटना लोहारा येथे घडली आहे. एका मुलाने आपल्याच जन्मदात्या आईची हत्या केल्याने लोहारा शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. उमाबाई सुरेश रणशुर असं ५५ वर्षीय हत्या झालेल्या आईचं नाव आहे. दरम्यान या घटनेने धाराशिव जिल्हा हादरला आहे.





मृत उमाबाई रणशुर

कानेगाव रोड, इंदिरानगर येथे राहणारे सौदागर सुरेश रणशुर, पुजा सौदागर रणशुर (दोघे रा. लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांनी २५ ऑगस्ट रोजी दुपारी बारा ते एक वाजण्याच्या सुमारास मृत उमाबाई सुरेश रणशुर (वय ५५ वर्षे, रा. लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांना घरगुती भांडणाच्या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, मारहाण करुन जिवे ठार मारले आणि तिला साडीने गळफास देवून मृत झाल्याचा बनाव केला.

याबाबत, महेश सुरेश रणशूर (वय ३५ वर्षे, रा. लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव, हल्ली मुक्काम शिवहरी ग्रीन सिटी प्लॅट नं. १०६ बी, वापी ता. पार्डी, जि. वलसाड, राज्य गुजरात) यांनी २६ ऑगस्ट रोजी दिलेल्या प्रथम माहितीवरुन पोलिस ठाणे लोहारा येथे भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### मृत उमाबाईच्या सर्वांगावर जखमा

या घटनेची माहिती मिळताच लोहारा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर कोकणाळे यांनी घटनास्थळी भेट दिली. तेव्हा मृत महिलेचा मृतदेह सापडून आला. त्यांच्या मृतदेहावरील जखमा पाहता त्यांना मारहाण झाल्याचं निदर्शनास आलं. या प्रकरणी पोलिसांनी तत्काळ गुन्ह्याची नोंद करुन घेत दोन्ही आरोपींना अटक केली असून दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर हे करत आहेत. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.